# REVIEWS OF LITERATURE

**International Multidisciplinary Peer Reviewed Journal**

**ISSN: 2347-2723** **Impact Factor: 5.8452**

**One Day Interdisciplinary National Level Online Conference on Local Society, Culture and History**

**Special Issue| Pages: 105 – 115**

**Research Paper** | **ISSN: 2347- 2723** | **Special Issue | October – 2024**


# आदिवासींच्या संस्कृतीचा अभ्यास
## (संदर्भ- मोखाडा, जव्हार तालुका, जि. पालघर)


**डॉ. जाधव संतोष हनुमंत**

सहाय्यक प्राध्यापक, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जि. पालघर.




**प्रस्तावना:**

इतिहास म्हणजे मानवी समाजाचा सर्वांगीण अभ्यास करणारे सामाजिक शास्त्र होय. इतिहास अभ्यासात राजकीय, सामाजिक, धार्मिक घटकांचा अभ्यास केला जातो. तसाच सांस्कृतिक क्षेत्राचा अभ्याससुद्धा महत्त्वपूर्ण आहे. मानव आपले जीवन जगताना संस्कृतीचे जतन करून तिचे संवर्धन करण्याचे काम करत असतो. आपले सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो. आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक जीवनात सण - उत्सव विशेष नव्हते तरीही मनोरंजन व सामाजिक जीवनातील विधी पूर्ण करताना शेती, कुटुंब व समाजाशी निगडित सांस्कृतिक जीवन आनंददायी होते. तारपा, ढोल, मोरघा नृत्याचा आनंद लोक घेतात. विवाहप्रसंगी गायली जाणारी गाणी, आवणी, कापणी, झोडणी वेळी गाणी गायली जातात. देव - देवता व त्यांची पूजा, विधी यांचे आदिवासी जीवनातील नेमकं स्थान काय? याचा शोध घेण्याचा प्रयत्न शोधनिबंधात केला आहे. सदर शोधनिबंधाची पुढील उद्दिष्टे आहेत.

१)आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

२) विवाह संस्कृती व त्याप्रसंगीच्या गाण्यांचा शोध घेणे.

३)मनोरंजनासाठी तारपा, ढोल, मोरघा नृत्याचा अभ्यास करणे.

या शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी ऐतिहासिक व सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. मौखिक साधनांच्या माध्यमातून मिळालेला पुरावा शोधनिबंधात वापरलेला आहे. मुलाखत पद्धत, कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित राहून निरीक्षण करून परंपरांची मांडणी केली आहे.

**आदिवासी म्हणजे काय ?**

आदिवासी हा शब्द विशिष्ट भाषा बोलणाऱ्या, विशिष्ट जीवनपद्धती व परंपरांनी नटलेल्या व शेकडो वर्ष दऱ्याखोऱ्यात जीवन जगत असताना, आपली धार्मिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणाऱ्या मानव समूहाची ओळख करून देण्यासाठी हा शब्द वापरला जातो. पाश्चिमात्य अभ्यासकांनी त्यांना 'Aboriginal' म्हटले आहे. लॅटिन भाषेतील 'Aborigines' म्हणजे देशात राहणारे सर्वात पहिले लोक. डॉ. घुर्ये यांनी 'तथाकथित मूळनिवासी' असे म्हटले आहे. या सर्व विद्वानांच्या अभ्यासावरून आदिवासी हे अतिप्राचीन काळापासून ह्या प्रदेशाचे आद्य रहिवासी आहेत असे दिसते. भारतीय संविधानाच्या ३४१ व ३४२ या अनुच्छेदामध्ये त्यांचा अनुसूचित जमात असा उल्लेख केला आहे.

**भारतीय संस्कृती कोश** – 'आदिवासी म्हणजे आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना वन्य जाती अथवा आदिवासी असे म्हणतात.'

**डॉ. घुर्ये** - 'त्यांना तथाकथीत मूळनिवासी व मागासलेले हिंदू असे म्हटले जाते.'

**गिलीन** – 'एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या, समान बोली बोलणाऱ्या, समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसणाऱ्या स्थानिक गटांच्या समुदायाला आदिवासी म्हणतात.'

**मोखाडा, जव्हार तालुक्यातील आदिवासी संस्कृती** –

कोकण आणि देश या दोन्ही प्रदेशाला जोडणारा मोखाडा जव्हार तालुका डोंगरदऱ्यांनी व्यापलेला आहे. या तालुक्यांमध्ये वास्तव्यास वारली, क-ठाकूर, कोकणा, महादेव कोळी, म – ठाकूर, कातकरी, मल्हार कोळी अशा आदिवासी जमाती आहेत. या आदिवासी जमाती आपली उपजीविका निसर्ग व शेती दोन्हीशी सांगड घालून चालवतात. आपले जीवन जगताना त्यांनी संस्कृतीचे जतन व संवर्धन केलेले आहे. जव्हार मोखाडा तालुक्यातील आदिवासी बांधव धार्मिक विधीमध्ये देव देवता आणि निसर्ग पूजेला महत्त्व देतात. आदिवासी जमातींमधील विवाह पद्धती संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. विवाहासंबंधी मांडव डहाळे, हळद, लग्नकार्य विशिष्ट पद्धतीने पार पाडले जाते. मुलगी पाहायला जाणे ते लग्न होईपर्यंत दारू - पाणी, साखरपुडा ( पेन ), बस्ता, हळद आणि लग्न असा क्रम असतो. या कार्यक्रमास प्रसंगी गाणी सांगण्याची पद्धत आहे. गाण्यांच्या माध्यमातून लग्नकार्य व कौटुंबिक जीवनाशी संबंधित सामाजिक सलोखा राखला जातो. त्याचवेळी मनोरंजन व संस्कृती संवर्धनासाठी तारपा नाच हा प्रमुख नृत्य प्रकार आहे. ज्यामध्ये महिला व पुरुषांचा सहभाग असतो. ढोलनाच ह्या सामूहिक नृत्य प्रकारात पुरुष सहभागी होतात. तसेच मोरघानाच, तुरनाच, गवत्या नाच असे नृत्य

प्रकार आहेत. तसेच होळी व बोहाडा वेळी अनेक प्रकारची सोंग आणली जातात. देव, राक्षस व प्राणी यांचे मुखवटे धारण करून नाच/नृत्य केली जातात.

**देव - देवता :**

आदिवासी समाजबांधव मुख्यत्वे निसर्गपूजक आहेत. त्यामुळे निसर्गाशी संबंधित देव देवतांची पूजा ते करतात. हिरवा, कणसरी, गावदेवी, माहुली, वाघ्यादेव असे प्राणी व वनस्पती व अन्नधान्याशी निगडीत त्यांची श्रद्धा आहे. अलीकडील २० – २५ वर्षापासून हनुमान मंदिर, महादेव मंदिर, गणपती मंदिर, खंडोबा अशा देवतांची प्रतिष्ठापना झालेली दिसते. दरवर्षी हनुमान जयंती, रामनवमी, गोकुळाष्टमी साजरी केली जाते. येथे आपण आदिवासी समाजातील पारंपारिक देवतांची माहिती घेऊया.

**हिरवा देव-**

जव्हार, मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजामध्ये हिरवा देव ही प्रमुख देवता आहे. सर्वच जमातीतील कुटुंबात हिरवा देव पूजन करतात. वर्षातून एकदा या देवाची विधिवत पूजा केली जाते. हिरवा देवाला मोर पिसांचा मान असतो. मोर पिसांचा जुडगा बनवून त्याच्या बुंध्याला देवाचा मुखवटा बसवला जातो. आदिवासी बांधव कुटुंबातील सर्व देव - देवता एका बांबूपासून बनविलेल्या टोपलीत ठेवतात. त्यांची दररोज पूजा केली जाते. वर्षातून एकदा विधी पूर्ण करण्यासाठी मोहापासून काढलेल्या दारूला जास्त महत्व असते. जसे की स्वर्ग लोकात सोमरस महत्वाचा मानला जातो. तसेच महत्व मोह रसाला आहे. त्याचबरोबर रात्रभर जागरण करून या कुलदैवताची कार्यक्रम पूर्ण केला जातो.

**कणसरी –**

ही देवता अन्नधान्याशी संबंधित असल्याचे दिसते. नागली (नाचणी), भात वरई या पिकांचे उत्पादन चांगल होण्यासाठी कणसरी देवतेची मदत होत असते असा समज आहे. आदिवासी कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती नवीन धान्य उत्पादन घेतल्यानंतर त्याची पूजा केल्याशिवाय त्यातील कोणतीही वस्तू आहारात घेत नाहीत. गाव पाड्यातील सर्व लोक विशेषतः ठाकूर समाजातील एकत्र येऊन रात्रभर घुमून जागरण करून नागली पिकाचे उपकार मानतात. व सर्व पिकांप्रती ते कृतज्ञ राहतात. या सर्व कार्यक्रमात कणसरी देवतेला महत्वाचे स्थान आहे.

**वाघ्यादेव –**

आदिवासी व जंगलातील वाघ याचं अतिशय जवळच नात आहे. वाघ हा हिंस्त्र प्राणी आहे. आदिवासी लोक डोंगरदऱ्या व जंगलात राहतात. तेथे जंगली प्राण्यांचा वावर जास्त असतो. वाघापासून संरक्षण व्हावे म्हणून त्याच्याबद्दल श्रद्धेने जगण्याची परंपरा आहे. गावाच्या पाड्याच्या शिवेवर लाकडावर वाघाची मूर्ती कोरलेली असते. तिला शेंदूर (केसरी रंग) लावला जातो. जंगलातील वाघांपासून आपले संरक्षण व्हावे म्हणून अशी मूर्ती गावाच्या शिवेवर व वेशीवर लावलेली दिसते. यावरून आदिवासी लोकांची जंगली प्राण्यांविषयी असलेली भक्ती दिसून येते.

**गावदेवी –**

आदिवासी भागातील प्रत्येक पाड्यात गावदेवीचे मंदिर आहे. गावदेवी नैसर्गिक आपत्ती व संकटापासून गावाचे रक्षण करते अशी समजूत आहे. गावदेवीला देवदेवतांमध्ये महत्वाचे स्थान आहे. दरवर्षी गावदेवीची यात्रा केली जाते. माहुल्या ही देवता आदिवासी समाजात आहे. आदिवासी समाजात पाड्यातील देव-देवतांच्या धार्मिक विधींमध्ये भगतला जास्त महत्व दिले जाते. पाड्यातील सर्व धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व लग्न कार्यात भगत महत्वाची भूमिका निभावतात.

**विवाह पद्धती व लोकगीते :-**

आदिवासी समाजातील जमातींमध्ये विवाह हे सगोत्रात केले जातात. आंतरजातीय विवाहाला परवानगी दिली जात नाही. विवाहाची सुरुवात मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमाने होते. त्यानंतर दारूपाणी, साखरपुडा, बस्ता, हळद आणि लग्न या क्रमाने विवाहापर्यंत कार्यक्रम होतात.

विवाहासाठी प्रथम मुलगा हा मुलगी पाहण्यासाठी मुलीच्या घरी जात असतो. दोघांनी एकमेकांना पसंत केल्यानंतर दारूपाण्याचा कार्यक्रम होतो. दारूपाणी कार्यक्रम म्हणजे मुलगा व मुलगी दोन्ही बाजूचे नातेवाईक एकत्र येऊन हा विधी पार पाडतात. यातील मुख्य उद्देश मुलगा व मुलगी यांना एकमेकांना भेटण्याची परवानगी दिली जाते. हा विधी दोन्ही बाजूचे भागात पूर्ण करतात. त्यासाठी दोन्ही कुटुंबातील प्रमुखांनी मोह फुलापासून बनविलेली दारू आणावयाची असते. ती सागाच्या पानावर मिश्र केली जाते. त्यानंतर दारूचे ड्रम आलेल्या नातेवाईकांना दिले जातात. मग जेवणाचा कार्यक्रम होतो. पुढचा विधी पेण म्हणजेच साखरपुड्याचा असतो. बस्ता बांधण्यासाठी गावातील लोक व नातेवाईक यांना सोबत नेले जाते. हळदीचा कार्यक्रम हा लग्नापूर्वी असतो. हळद लागल्यानंतर लग्न विधीचा कार्यक्रम होतो. या सर्व विधींच्या दरम्यान गाणी गायली जातात. या गाण्यांमधून कौटुंबिक व सामाजिक सलोखा प्रतीबिंबित होत असतो.

**साखरपुडा गीत**

**कधी झाला ना साखरपुडा**

*कधी झाला ना साखरपुडा हाती भरला ना हिरवा चुडा*
*रडू नको रे माझ्या बाबा आज जाईल उद्या येईल*
*कधी झाला ना साखरपुडा हाती भरला ना हिरवा चुडा*
*रडू नको रे माझ्या माई आज जाईल उद्या येईल*
*कधी झाला ना साखरपुडा हाती भरला ना हिरवा चुडा*
*रडू नको रे माझ्या भावा आज जाईल उद्या येईल*
*कधी झाला ना साखरपुडा हाती भरला ना हिरवा चुडा*
*रडू नको रे माझ्या बहिणी आज जाईल उद्या येईल*
*कधी झाला ना साखरपुडा हाती भरला ना हिरवा चुडा*
*रडू नको रे माझ्या मेव्हण्या आज जाईल उद्या येईल*

मुलगी पाहण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर साखरपुड्याचा कार्यक्रम होतो. त्यासाठी नवरा मुलगा व त्याचे नातेवाईक आणि मुलगी व तिचे नातेवाईक हजार असतात. त्यावेळी आई, बाबा, भाऊ, बहिण यांना उद्धेशून हे गीत गायलं जात. त्यामुळे नात्यातील प्रेम व आपुलकी दिसून येते.

**बास्ताचे गीत**

**काळ घोड गेलं कौलाचे वाटव**

*काळ घोड गेलं कौलाचे वाटव*
*कायी साटता पडल्या रातीव*
*फडकी साटता पडल्या रातीव*
*जोडव्या साटता पडल्या रातीव*
*पैंजण साटता पडल्या रातीव*
*चुडा साटता पडल्या रातीव*
*गरसोड साटता पडल्या रातीव*
*खोबरा साटता पडल्या रातीव*
*खारका साटता पडल्या रातीव*
*सुपाऱ्या साटता पडल्या रातीव*
*बाशिंग साटता पडल्या रातीव*
*करंडा म्हणीत एकटा कसा*
*संगा तांदळाच्या गोणीव*
*संगा नेईल हळदीच्या गोणीव*
*संगा नेईल नारळाच्या गोणीव*
*करंडी म्हणीत उलडत जाईव*

लग्नाच्या तयारीसाठी आवश्यक कपडे, दागदागिने, खारीक, खोबरे, बाशिंग, सुपारी इ.ची आवश्यकता असते.त्या वस्तू आणण्यासंबंधी आणि त्या वस्तूंबद्दल कृतज्ञता भाव व्यक्त झालेला दिसतो.

**हळद गीत**

**अठवरेचा लगीन निघाला**

*महादेव पारवत निघाली कोकणात*
*अठवरेचा लगीन निघाला हळदी बनात*
*अठवरेचा लगीन निघाला सुपारी बनात*
*अठवरेचा लगीन निघाला खोबरे बनात*
*अठवरेचा लगीन निघाला खारके बनात*
*अठवरेचा लगीन निघाला शेंदरे बनात*
*अठवरेचा लगीन निघाला कुंकवे बनात*
*अठवरेचा लगीन निघाला गुलाल बनात*
*अठवरेचा लगीन निघाला उंबरे बनात*

**लग्नावेळी गायली जाणारी गीत**

**लग्नात दिले जाणारे साहित्याविषयी गीत**

लग्नावेळी मुलीला जे साहित्य दिले जाते. त्या साहित्याविषयी हे गीत गायले जाते.

*नदीकिनारी बंगला बांधिला चारे बाजू रंग ग येनी चारे बाजू रंग.*
*चारे बाजू रंग ग येनी चारे बाजू रंग*
*त्या बंगल्यावर नक्षी काढली चिमणी,पोपट, मोर*
*ग येनी चिमणी पोपट, मोर, चिमणी, पोपट, मोर*
*ग येनी चिमणी पोपट,मोर*
*त्या बंगल्यावर आली ईहीन*
*त्या इनीला दिला पलंग*
*त्या पलंगावर दिली गादी*
*त्या गादीवर दिली उसी*
*त्या उसीवर ठेवली बसी*
*त्या बसित ठेवला कप*
*त्या कपात ठेवली नथ*
*नथीचा मोल कर ग येनी येया संग बोल*
*नथीचा मोल कर ग येनी येया संग बोल*

**मांडवाचे गीत -**

*खादांवरील कुरांडी कुठे चालल्या वराडी*
*चंदनाच्या मेढी मांडवाला ग चंदनाच्या मेढी मांडव वाला ग*
*नवऱ्याचा बाबा काय रे मुका मुका*
*दारूचा डरम झाला रीता*
*खादांवरील कुरांडी कुठे चालल्या वराडी*
*चंदनाच्या मेढी मांडव वाला ग*
*नवऱ्याच आई काय रे मुकी मुकी*
*पैसाचा पॉकेट झाला रीता ग*

लग्नासाठी मंडप उभा करण्यासाठी आवश्यक मेढी व इतर घटनासंबंधी वर्णन सदर गीतात आलेले आहे.

**लग्नावेळी गायलं जाणार गीत-**

*वादळवाऱ्याची खुर्ची, त्यावर गणपती मूर्ती,*
*शुभ मंगल बोलूया, लग्नाच्या दिवशी*
*शुभ मंगल बोलूया लग्नाच्या दिवशी*
*दिले हातावरी हात किती आनंद झाले*
*या सासऱ्याच्या मनात*
*किती आनंद झाले या सासऱ्याच्या मनात*

*वादळवाऱ्याची खुर्ची, त्यावर गणपती मूर्ती,*
*शुभ मंगल बोलूया ,लग्नाच्या दिवशी*
*शुभ मंगल बोलूया लग्नाच्या दिवशी*
*दिले हातावरी हात किती आनंद झाले*
*या सासूच्या मनात*
*किती आनंद झाले या सासूच्या मनात*

**मुलगी सासरी जातानाचे गीत-**

*रडू नको बाबा सासरला जाते घडोघडी आठवण मजला माहेरची येते*
*घडोघडी आठवण मजला माहेरची येते*
*कोऱ्या कागदाचा बनविला च्याप*
*सुखी ठेव देवराया जन्म:दाता बाप*
*सुखी ठेव देवराया जन्म:दाता बाप*
*रडू नको बाबा सासरला जाते घडोघडी आठवण मजला माहेरची येते*
*घडोघडी आठवण मजला माहेरची येते*
*कोऱ्या कागदाची बनविली शाई*
*सुखी ठेव देवराया जन्म:ची आई*
*सुखी ठेव देवराया जन्म:ची आई*

**आई – वडिलांच्या आठवणीसंबंधी गीत**

**सोनियाची घागर**

*सोनियाची घागर.... मोत्याची चुंबळ*
*पाण्याला जाते बाई मी गंगा पाणी निर्मळ*
*सासूची पायरी कधी मला सुटेना*
*माय माझी रूखमिनी माता कधी मला भेटेना*
*सोनियाची घागर मोत्याची चुंबळ*
*पाण्याला जाते बाई मी गंगा पाणी निर्मळ*
*सासऱ्याची पायरी कधी मला सुटेना*
*बाप माझा पांडुरंग कधी मला भेटेना*
*सोन्याची घागर मोतीयाची चुंबळ*
*पाण्याला जाते बाई मी गंगा पार निर्मळ*

**माहेर नातेसंबंध गीत-**

*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*
*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*
*भरत तुझी मामी आली ग मोठ्या मनाची*
*भरत तुझी मामी आली का मोठ्या मनाची*
*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*

*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*
*भरत तुझा चुलता आला का मोठ्या मनाचा*
*भरत तुझा चुलत आला मोठ्या मनाचा*
*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*
*मांडव दारी चाफा फुललेला पिवळ्या फुलाचा*
*भरत तुझी चुलते आली का मोठ्या मनाची*
*भरत तुझी चुलते आले का मोठ्या मनाची*
*मांडव दारी चाफा फुलेला पिवळ्या फुलाचा*
*मांडवदारी चाफा फुललेला पिवळ्या फुलाचा*

**आई बापाच्या**

*आई बापाच्या भाऊबंदाच्या एक विचारण न एक विचारणं*
*दिलं तुला ग दुर्गाताई गरिबी घराण्यात*
*सासु मिळाली आई वानी वागवेल प्रेमाने वागवेल प्रेमाने*
*दिल तुला ग दुर्गाताई गरिबी घराण्यात*
*सासरा मिळाला बाबावाने वागवेल प्रेमाने वागवेल प्रेमाने*
*दिला तुला ग दुर्गाताई गरिबी घराण्यात*

**सासरच्या नात्यासंबंधी गीत –**

**गाडी आली घुंगराची -**

*गाडी आली गाडी आली गाडी घुंगराची नी*
*माझे धाकले देरांची माझे धाकले देरांची*
*गुलाब तुझी आई आहे दोन दिवसाची नी*
*सासू आहे जलमझुराची*
*गाडी आली गाडी आली गाडी घुंगराची नी*
*माझे धाकले देरांची माझे दाखले देरांची*
*गुलाब तुझा बाबा आहे दोन दिवसांचा आणि सासरा आहे जलमझुराचा*

**निळा पोपट जंगीलात**

*निळा पोपट जंगीलात जंगीलात*
*निळा पोपट जंगीलात जंगीलात*
*मला दिलाय कोकणात कोकणात*
*मला दिलाय कोकणात कोकणात*
*सासूनी सांगितले पाणी भराय पाणी भराय सासूनी सांगितले पाणी भराया*
*पडले मी विहिरीत ग बाय बाय पडले मी विहिरीत*
*निळा पोपट जंगीलात निळा पोपट जंगीलात*

**गंठणाचे काळे मने**

*गंठणाचे काळे मने गंठणाला जोडले*
*गंठणाचे काळे मने गंठणाला जोडले*
*आईबाप सोडले मी सासू-सासरे जोडले*
*गंठणाचे काळे मने गंठणाला जोडले*
*भाऊ बहीण सोडले मी नंद-देर जोडले*
*गंठणाचे काळे मने गंठणाला जोडले*
*माहेरवाडी सोडले मी सासरवाडी जोडले*

अशा प्रकारे कौटुंबिक जीवनातील महत्वाचा संस्कार म्हणजे विवाह होय. या संस्कारात प्रत्येकवेळी गाणी सांगण्याचे काम केले जाते. त्यातून नातेसंबध दृढ करणे व एकमेकाविषयी प्रेम व आपुलकी वाढविण्यासाठी प्रयत्न होत असतो.

**आदिवासी नृत्य –**

जव्हार, मोखाडा तालुक्यातील आदिवासींमध्ये मनोरंजन व संस्कृती संवर्धनासाठी तारपा नाच हा प्रमुख नृत्य प्रकार आहे. ज्यामध्ये महिला व पुरुषांचा सहभाग असतो. ढोलनाच हा सामूहिक नृत्य प्रकारात पुरुष सहभागी होतात. तसेच मोरघानाच, तुरनाच, गवत्या नाच असे नृत्य प्रकार आहेत.

**तारपा नृत्य –**

तारपा नृत्य हे प्रत्येक आदिवासी जमातींमध्ये सादरीकरण केला जाणारा नृत्य प्रकार आहे. या नृत्य प्रकारात स्त्री आणि पुरुष सहभागी असतात २५ ते ५० अशी सहभागी लोकांची संख्या असते. वर्तुळाकार उभारून तारपा नृत्याची सुरुवात होते. त्यामध्ये अनेक प्रकारे साखळी, नागमोडी वळण घेत नृत्याविष्कार साजरा केला जातो. गोल वर्तुळाच्या मध्यभागी तारपा हे साधन वाजवणारी व्यक्ती असते. संबंधित व्यक्ती तारपा वजविण्यात निष्णात असते. तारपा जे सूर ध्वनित करतो त्याप्रमाणे सहभागी व्यक्ती नृत्याचा ताल धरतात. तारपा वाजविणारी व्यक्ती त्यामधील सुर वाजविताना त्यातील चढ - उतारा नुसार नृत्याची गती वाढत जाते. तारपा वाजवणारी व्यक्ती व नृत्य करणारा समूह तल्लीन होऊन नाचत असतो. या नृत्यात तरुण मुले व मुली यांचा विशेष सहभाग असतो. या माध्यमातून आदिवासी बांधव आनंद साजरा करून इतरांचे मनोरंजन करत असतात. तारपा बनविण्यासाठी भोपळ्याचा वापर केला जातो.

**ढोल नृत्य –**

ढोल नृत्यांमध्ये पुरुषांचा सहभाग असतो. एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून वर्तुळाकार पद्धतीने हा नाच साजरा केला जातो. वर्तुळाच्या मध्यभागी ढोल वाजवणारी व्यक्तीव्यक्ती असते. या समूह नृत्यात २५ ते ५० पर्यंत पुरुष सहभागी होतात. हे नृत्याचे सादरीकरण करताना पुरुष पायामध्ये चाळ (घुंगराचे) बांधतात. डोक्याला कापडाची पट्टी बांधतात ढोल नृत्य करताना गाण्यांचे सादरीकरण केले जाते. आपल्या परिसरातील विशेष ठिकाणे व वस्तूंना त्यातून आवाहन करून कृतज्ञता व्यक्त

केली जाते. येथील वतावड्या डोंगराला साद घातली जाते. ढोलनाच सादरीकरण हे मनोरे व इतर नृत्याविष्कारांचा अंतर्भाव केला जातो. ढोल नृत्य सुरुवातीस हळूहळू असते नंतर ढोल वाजविण्याची गती वाढेल तसे नृत्याची गती वाढत जाते. शेवटी शांत पद्धतीने या नृत्याचा शेवट केला जातो.

**सारांश –**

अशा प्रकारे कौटुंबिक जीवनातील महत्वाचा संस्कार म्हणजे विवाह होय. या संस्कारात प्रत्येकवेळी गाणी सांगण्याचे काम केले जाते. त्यातून नातेसंबंध दृढ करणे व एकमेकाविषयी प्रेम व आपुलकी वाढविण्यासाठी प्रयत्न होत असतो. संस्कृती हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्याला कोणताही मानवी समुदाय अपवाद राहू शकणार नाही. प्रत्येक समाजाची ओळख म्हणजे त्या समाजाची संस्कृती होय. जव्हार, मोखाडा तालुक्यातील आदिवासींमध्ये मनोरंजन व संस्कृती संवर्धनासाठी तारपा नाच हा प्रमुख नृत्य प्रकार आहे. ज्यामध्ये महिला व पुरुषांचा सहभाग असतो. ढोलनाच हा सामूहिक नृत्य प्रकारात पुरुष सहभागी होतात.

**संदर्भ साधने -**

**मुलाखती –**

१) भगीरथ वारघडे, घानवळ,०८/०३/२०२४.
२) भाऊ पढेर, पारध्याची मेट, ०८/०३/२०२४.
३) भाऊ वारघडे, बोहाडा मुखवटा निर्माते व आदिवासी नृत्य प्रशिक्षक, चास, मोखाडा,
1. ०८/०३//२०२४.
४) भास्कर राऊत, संकलक आदिवासी वस्तू प्रतिकृती, आणि प्रबोधानकर्ते आदिवासी
2. संस्कृती,२०/०८/२०२३.
५) रामू भोये, मुकुंदपाडा,१४/०६/२०२३.
६) केशव डामसे, पळसपाडा, ०९/०३/२०२४.
७) राजेंद्र घाटाळ, खडखड, १२/०७/२०२३.
८) गोपीनाथ धोडी, पुलाची वाडी, २२/०२/२०२४.
९) हरिचंद्र राऊत, कोलद्याचापाडा, २६/०१/२०२४.
१०)गंगाराम दिघा, टाकपाडा. १४/०६/२०२३.
११)बाळकृष्ण गांगड, मडक्याची मेट, २९/१२/२०२३.
१२)कादर बाबा, कावळपाडा, २०/०१/२०२४.
१३)जयकुमार आंबेकर, गुंबडपाडा,१२/०१/२०२४.

**संदर्भ ग्रंथ -**

१) पं. महादेवशास्त्री जोशी,(संपा.), भारतीय संस्कृतीकोश,भा.सं. मंडळ पुणे,खंड-६,मार्च१९९८.
२) (डॉ.) हेमंत बळवंत मुकणे, जव्हार संस्कृतीची शोधयात्रा, चैतन्य, नाशिक, २००७
३) लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), मराठी विश्वकोश, खंड – , मुंबई, १९७६.
४) शौनक कुलकर्णी, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड, पुणे.
५) गोविंद गारे, आदिवासी कला, गमभन.
६) पुष्पा गावित, आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य.